इक्विटीशी संलग्न म्युच्युअल फंडांना एप्रिलमध्येही चांगली मागणी दिसून आली. या प्रकारच्या फंडात एप्रिलमध्ये १५ हजार ८९० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. इक्विटी फंडात चांगली गुंतवणूक होण्याचा हा सलग चौदावा महिना ठरला आहे. असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडियाने ही माहिती दिली.

या फंडांमध्ये मार्चच्या तुलनेत मात्र कमी गुंतवणूक झाली. मार्चमध्ये इक्विटी फंडाद्वारे एकूण २८ हजार ४६३ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती. 'शेअर बाजारातील अस्थिरता पाहता गुंतवणूकदारांनी एप्रिलमध्ये सावध पवित्रा घेतला असावा,' असे मत मॉर्निंगस्टार इंडियाचे हिमांशू श्रीवास्तव यांनी व्यक्त केले. यापूर्वी जुलै २०२० ते फेब्रुवारी २०२१ या कालावधीत गुंतवणूकदारांनी इक्विटी म्युच्युअल फंडातून गुंतवणूक काढण्याचा सपाटा लावला होता.

## निर्देशांकांच्या पडझडीमुळे गुंतवणूकदार चिंतेत

**सेन्सेक्स, निफ्टीमध्ये सलग चौथ्या सत्रांत घसरण**

**वृत्तसंस्था,** मुंबई

मुंबई व राष्ट्रीय शेअर बाजारातील सततच्या पडझडीमुळे गुंतवणूकदार हवालदिल झाले आहेत. सेन्सेक्स व निफ्टीमध्ये बुधवारी सलग चौथ्या सत्रात घसरण झाली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक २७६ अंकांच्या घसरणीसह ५४०८८वर बंद झाला. तर ७२ अंकांनी घसरलेल्या निफ्टीने १६१६७चा स्तर गाठला.

सुरुवातीच्या सत्रात वधारलेला निर्देशांक नंतर टिकाव धरू शकला नाही. अमेरिकेतील वाढते व्याजदर, महागाई तसेच विदेशी गुंतवणूकदारांकडून सतत काढण्यात येत असलेली गुंतवणूक, कच्च्या इंधनाची किंमतीत होणारी वाढ यामुळे गुंतवणूकदारांनी बुधवारी समभागविक्रीवरच भर दिला. बाजाराच्या सत्रांतर्गत व्यवहारात सेन्सेक्स ८४५ अंकांनी गडगडून ५३५१९पर्यंत खाली गेला होता. परंतु उत्तरार्धात तो सावरला व ही घसरण काही प्रमाणात थोपवली गेली.

**'एल अँड टी'ला फटका**

मुंबई शेअर बाजारात 'एल अँड टी'च्या समभागाचे मूल्य सर्वाधिक म्हणजे २.३४ टक्क्यांनी घसरले. याशिवाय बजाज फिनसर्व्ह, एनटीपीसी, बजाज फायनान्स, मारुती सुझुकी, पॉवरग्रीड, इन्फोसिस, आयटीसी या समभागांचे मूल्यही घटले. दुसरीकडे, ॲक्सिस बँक, इंडसइंड बँक, एचडीएफसी, कोटक महिंद्रा बँक, एचडीएफसी बँक यांचे समभाग मात्र वधारले.

**रुपया वधारला**

**मुंबई :** डॉलरच्या तुलनेत रुपया बुधवारी दहा पैशांनी वधारला. रुपयाने प्रतिडॉलर ७७.२४ असा नवा दर नोंदवला. दोन दिवसांपूर्वी रुपया नीचांकी स्तरावर पोहोचला होता.

**बाजारभाव**

| | |
|---|---|
| सोने | ₹ ५१२०५ |
| चांदी | ₹ ६१४५० |
| सेन्सेक्स | ५४०८८ |
| निफ्टी | १६१६७ |
| डॉलर | ₹ ७७.२४ |
| युरो | ₹ ८१.६० |

## ऑनलाइन गेमिंग आणि संभाव्य करबदल

**ऑनलाइन गेमिंग क्षेत्र १८ टक्क्यांच्या जीएसटीच्या कक्षेतच राहावे, यासाठी उद्योजकांनी कंबर कसली आहे. ऑनलाइन गेमिंग क्षेत्र २८ टक्क्यांच्या करकक्षेत नेण्याचा प्रस्ताव आहे. तसे झाले, तर उद्योगाला २.२ अब्ज अमेरिकी डॉलरचा फटका बसणार असल्याचे उद्योजकांचे मत आहे. त्याविषयी...**



**पुढील बैठकीत निर्णय**

- ‘जीएसटी परिषदे’च्या पुढील बैठकीत यावर निर्णय होण्याची शक्यता आहे.
- कॅसिनो, रेस कोर्स, ऑनलाइन गेमिंग सेवा यांवर २८ टक्के जीएसटी आकारण्यात यावा, अशी सूचना राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या पॅनेलने नुकतीच केली होती.
- ऑनलाइन गेमिंग क्षेत्र २८ टक्क्यांच्या करकक्षेत यावे, या संदर्भातील प्रस्ताव राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या गटाने एकमताने मंजूर केला आहे. पश्चिम बंगालचे अर्थमंत्री चंद्रिमा भट्टाचार्य यांनी ही माहिती दिली होती.

**मटा दृष्टिक्षेप**

**पार्श्वभूमी**

ऑनलाइन गेमिंग, कॅसिनो, रेस कोर्स आदींवरील जीएसटी वाढवण्यासाठी सरकारने गेल्या वर्षी मेमध्ये एका गटाची स्थापना केली होती. सरकारने स्थापन केलेल्या या मंत्रीगटाची मेघालयचे मुख्यमंत्री कोनराड संगमा यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली. त्यावेळी या ऑनलाइन गेमिंगवर चर्चा झाली. ऑनलाइन गेमिंग, रेस कोर्स व कॅसिनो यांच्यावर सर्वाधिक जीएसटी आकारला जावा, यावर या मंत्रीगटाचे एकमत झाले. मंत्रीगटाच्या बैठकीत या खेळांवर जीएसटी आकारणीसाठी त्यांचे ढोबळ मूल्य व निव्वळ मूल्य गृहीत धरावे हे ठरणार आहे.

**करांची सद्यस्थिती**

- ऑनलाइन गेमिंग क्षेत्र सध्या १८ टक्क्यांच्या करकक्षेत आहे.
- सध्या प्लॅटफॉर्म शुल्कावर आधारित ‘ग्रॉस गेमिंग रेव्हेन्यू’ (जीजीआर) आकारला जातो. एकूण ढोबळ मूल्यावर आकारला जात नाही.
- आंतरराष्ट्रीय स्तरावर १५ ते २० टक्क्यांच्या करकक्षेत या क्षेत्राचा समावेश.

**ऑनलाइन गेमिंग क्षेत्रात काय येते?**

ई-स्पोर्ट्स, फँट्सी गेम्स, रमी, पोकर, बुद्धिबळ इत्यादी. हे खेळ मोफत असतात किंवा त्यांच्यावर ‘प्लॅटफॉर्म शुल्का’च्या रूपात पैसे आकारले जातात.

**कर वाढल्यास काय होईल?**

गेमिंग उद्योग २८ टक्क्यांच्या करकक्षेत आणला, तर त्याचा देशातील उद्योगालाच केवळ फटका बसणार नाही, तर विदेशातील व्यवहारांनाही बसण्याची शक्यता आहे. विदेशातही कर वाढण्याची शक्यता त्यामुळे निर्माण होईल, अशी प्रतिक्रिया ‘गेम्स २४x७’चे सीईओ त्रिविक्रम थंपी यांनी दिली. उद्योग, सरकार आणि महसुलावरही याचा विपरीत परिणाम होऊ शकेल.

## आयुर्विमा व्यवसायात एप्रिलमध्ये मोठी वाढ

**वृत्तसंस्था,** नवी दिल्ली

देशातील आयुर्विमा व्यवसायात एप्रिलमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून आले. आयुर्विमा कंपन्यांनी एप्रिलमध्ये नव्या पॉलिसींद्वारे एकूण १७ हजार ९४० कोटी रुपयांचे हप्ते (प्रीमियम) संकलित केले. गेल्या वर्षीच्या एप्रिलच्या तुलनेत यात तब्बल ८४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. एप्रिल २०२१मध्ये आयुर्विमा कंपन्यांनी नवीन व्यवसायापोटी एकूण ९ हजार ७३९ कोटी रुपयांचे हप्ते जमा केले होते. विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाने (इर्डा) ही माहिती दिली आहे.

या २४ कंपन्यांमध्ये भारतीय आयुर्विमा महामंडळाने (एलआयसी) सर्वाधिक व्यवसाय केल्याचे स्पष्ट झाले आहे. एलआयसीने एप्रिलमध्ये नव्या पॉलिसींद्वारे तब्बल ११ हजार ७१६ कोटी रुपयांचा व्यवसाय केला. एलआयसीने गेल्या वर्षीच्या एप्रिलच्या तुलनेत १४१ टक्क्यांची वृद्धी साधली. नव्या पॉलिसींद्वारे केलेल्या व्यवसायात एलआयसीनंतर स्टार युनियन दाय-इची, टाटा एआयए लाइफ या कंपन्यांचा क्रमांक लागतो.

## शब्दखेळ क्र. १०८

विजय तरवडे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ | १ | २ | ■ | ३ | | ४ | |
| ५ | | | ६ | | ■ | | ■ |
| ■ | | ■ | | ■ | ७ | | ८ |
| ९ | | | ■ | १० | ■ | ११ | |
| ■ | | ■ | १२ | | १३ | | ■ |
| १४ | | | | ■ | | ■ | १५ |
| ■ | | | १६ | | | | |
| १७ | | | | ■ | | ■ | |

**आडवे शब्द :** १. शरीर ३. बोलावणे, आमंत्रण ५. एके काळी मेवाडची राजधानी असलेले शहर, याला सरोवरांचे शहर असेही संबोधतात. ७. संपूर्ण ९. अगम्य, अनाकलनीय ११. उद्यान १२. कॉफीला सुगंध देणारा जुना पदार्थ १४. तंबाखूमधला आरोग्यविघातक घटक १६. भ्रष्ट कर्मचाऱ्यांची दोन नंबरची कमाई १७. विश्वास

**शब्दखेळ १०७ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ | ओ | द | न | ■ | क | ■ | आ |
| चि | ली | म | ■ | व | ल्ह | व | णे |
| ■ | सु | ट | का | ■ | ई | ■ | वा |
| टा | की | ■ | पू | र | ■ | व | री |
| र | ■ | र | स | म | ल | ई | ■ |
| झ | ग | डा | ■ | ता | स | ■ | गो |
| न | ग | र | ■ | रा | ■ | दा | व |
| ■ | न | ड | ■ | म | क्ते | दा | री |

**उभे शब्द :** १. बंगालच्या खाडीतील प्रसिद्ध द्वीपसमूह, हा केंद्रशासित प्रदेश आहे. ब्रिटिशांच्या काळात काळ्या पाण्याची शिक्षा झालेले कैदी इथे धाडले जात. २. दयामाया ३. पलीकडे ४. जखमेतून रक्त वाहत असलेला ६. मेजवानी ८. आच, उष्णता १०. ऱ्हास; श्वसनमार्गाचा गंभीर आजार १२. परगावाहून आलेल्या वऱ्हाडी मंडळींसाठी मुक्कामाची जागा १३. स्पष्टवक्ता, फाटक्या तोंडाचा १५. मोतद्दार, घोड्याची निगा राखणारा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**हवाई अधिभार :** गोवा मार्गे १ रुपया, इंदूर, चेन्नई मार्गे ३ रुपये, अहमदाबाद, बंगलोर, कोची, कोइम्बतूर, एर्नाकूलम, हैदराबाद, कोझिकोड, मंगळूर, त्रिवेंद्रम, उदयपूर, विझागमार्गे ४ रुपये, दिल्ली, कोलकाता मार्गे ५ रुपये. रस्ते अधिभार : रु. २.०० (बलसाड जिल्हा, सिल्वासा, दमण, इंदौर ही शहरे वगळून.) बेनेट, कोलमन अँड कंपनी लि.च्या वतीने आर. कृष्णमूर्ती, यांनी टाइम्स ऑफ इंडिया इमारत, डॉ. डी. एन. रोड, मुंबई - ४०० ००१ येथे प्रकाशित केले व १) द टाइम्स ऑफ इंडिया सबर्बन प्रेस, आकुर्ली रोड, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, कांदिवली (पू), मुंबई - ४०० १०१, फोन (०२२) २८८७२३२४, २८८७२९३०, फॅक्स - (०२२) २८८७४२३०. २) द टाइम्स ऑफ इंडिया प्रिंट सिटी, प्लॉट नं. ४, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, ठाणे-बेलापूर रोड, ऐरोली, नवी मुंबई-४००७०८. फोन (०२२) २७६०९९९९, फॅक्स - (०२२) २७६०५२७५ येथे मुद्रित केले.
© सर्वाधिकार सुरक्षित, प्रकाशकांच्या लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनर्प्रकाशनास बंदी.
**संपादक : पराग करंदीकर, निवासी संपादक - श्रीकांत बोजेवार* (मुंबई आवृत्ती)** (*पीआरबी कायद्यानुसार बातम्यांच्या निवडीसाठी जबाबदार) नोंदणी क्र. एमसीएस/०६३/२०१५-१७. आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ९२४९/६२.


**NOCIL**

**नोसिल लिमिटेड**

सीआयएन: L99999MH1961PLC012003
नों. कार्यालय: मफतलाल हाऊस, एच्. टी. पारेख मार्ग, बॅकबे रेक्लेमेशन, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०. दुर. क्र.: ९१-२२-६६३६४०६२ फॅक्स: ९१-२२-६६३६४०६०
वेबसाईट: www.nocil.com ईमेल: investorcare@nocil.com

**भागधारकांकरिता सूचना**
**इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंडामध्ये (आयईपीएफ) समन्याय भागांचे स्थानांतरण**

कंपनी अधिनियम २०१३ ची कलमे १२४ आणि १२५ तसेच वेळोवेळी सुधारित करण्यात आलेल्या आयईपीएफ (लेखा, लेखा परीक्षा, हस्तांतरण आणि परतावा) नियमावली २०१६ च्या अनुषंगाने कंपनीला गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ) च्या नावे सलग सात किंवा त्यापेक्षा अधिक वर्षांपर्यंत दावा न केलेल्या किंवा प्रदान न केलेल्या लाभांशाच्या संबंधातील शेअर्स चे हस्तांतरण करणे आवश्यक आहे. सलग सात (७) वर्षांच्या सदर कालावधी दरम्यान एखाद्या वर्षी जर लाभांश प्रदान केलेले असेल किंवा त्याची मागणी केलेली असेल तर त्यावरील अधोरेखित शेअर्स आयईपीएफ मध्ये हस्तांतरित केले जाणार नाहीत.

त्यानुसार दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी आयोजित केलेल्या भागधारकांच्या ५३ वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये घोषित केलेल्या आर्थिक वर्ष २०१४-२०१५ च्या संबंधातील मागणी न केलेल्या / प्रदान न केलेल्या लाभांशाच्या संबंधातील आणि सलग सात (७) वर्षांच्या कालावधीसाठी मागणी न केलेल्या / प्रदान न केलेल्या लाभांशाच्या संबंधातील अधोरेखित शेअर्सचे दिनांक **२९ ऑगस्ट, २०२२** रोजी आयईपीएफ मध्ये हस्तांतरण करणे अनिवार्य झालेले आहे.

सदर नियमावली अनुषंगाने, कंपनीने ज्यांचे शेअर्स आयईपीएफ मध्ये हस्तांतरित करण्यास पात्र आहेत आणि ज्यांनी आर्थिक वर्ष २०१४-१५ अनुसार सलग सात वर्षे लाभांशाची मागणी केलेली नाही, अशा भागधारकांना दिनांक ०५ मे, २०२२ रोजीच्या व्यक्तिगत पत्राद्वारे त्यासाठी दावा करण्याची विनंती करण्याविषयी कळविलेले आहे.

कंपनीने आयईपीएफ मध्ये हस्तांतरित करण्यास पात्र असलेल्या शेअर्सच्या भागधारकांचे तपशील त्यांच्या या www.nocil.com संकेत स्थळावर अपलोड केलेले आहेत. भागधारकांना विंनती करण्यात येते की, त्यांनी, आयईपीएफ मध्ये हस्तांतरित करण्यास पात्र असलेल्या शेअर्स चे तपशील पडताळण्यासाठी या संकेतस्थळाला भेट द्यावी.

दिनांक ३०, जून, २०२२ पर्यंत आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी मागणी न केलेल्या / दावा न केलेल्या लाभांशाची मागणी करण्यासाठी भागधारकांना सूचना देण्यात येते की, जेणेकरुन शेअर्सचे हस्तांतरण आयईपीएफ मध्ये केले जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी की, दिनांक ३० जून, २०२२ अनुसार, जर लाभांशाचे प्रदान केलेले नसेल, तर कंपनी सुधारित नियमावलीमध्ये निर्धारित केलेल्या अशा भागधारकांच्या शेअर्सचे हस्तांतरण करण्यासाठी कार्यवाही पुढील सुचना न देता दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ या नियत तारखे पर्यंत सुरु करील.

सुधारित नियमावलीनुसार मूर्त स्वरुपामध्ये शेअर्स धारण करणाऱ्या संबंधित भागधारकांनी आणि ज्यांचे शेअर्स आयईपीएफ मध्ये हस्तांतरित करण्यास पात्र आहेत, अशांनी कृपया याची नोंद घ्यावी की, कंपनी डीमॅट स्वरुपामध्ये रुपांतरण करण्याच्या उद्देशाने त्यांनी धारण केलेल्या मूळ प्रमाणपत्राऐवजी नवीन शेअर प्रमाणपत्र जारी करील आणि त्यानंतर आयईपीएफ प्राधिकरणाच्या डीमॅट खात्यामध्ये हस्तांतरित करील. अशा बाबतीत मूळ शेअरप्रमाणपत्र, जे तुमच्या नावे नोंदणीकृत करण्यात आलेले असेल ते आपोआपच रद्द होईल आणि वाटाघाटी करण्यास अयोग्य होईल. डीमॅट स्वरुपामध्ये शेअर्स धारण करणाऱ्या अशा भागधारकांच्या बाबतीत, कंपनी ज्याच्या संबंधित निक्षेपस्थानीद्वारे आयईपीएफ प्राधिकरणाच्या डीमॅट खात्यामध्ये शेअर्स चे हस्तांतरण करील.

**भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, कंपनीने आपल्या संकेतस्थळावर अपलोड केलेल्या अशा भागधारकांच्या यादीचे वरील संपूर्ण तपशील गृहीत धरावे आणि सुधारित नियमावलीच्या अनुषंगाने, आयईपीएफ प्राधिकरणाच्या डीमॅट खात्यामध्ये शेअर्सचे हस्तांतरण करण्याच्या उद्देशाने नवीन शेअर प्रमाणपत्र जारी करण्याच्या संबंधातील ही पुरेशी सूचना आहे, असे गृहीत धरावे.**

अशा शेअर्स वरील कोणताही पुढील लाभांश आयईपीएफ मध्ये जमा करण्यात येईल. मागणी न केलेल्या लाभांशाच्या संबंधात आणि आयईपीएफ मध्ये हस्तांतरित केलेल्या शेअर्सच्या संबंधात कंपनी विरुध्द कोणताही दावा केला जाणार नाही. लाभांशाचे आणि शेअर्सचे आयईपीएफ मध्ये हस्तांतरण केल्यावर, भागधारकांनी नियमानुसार प्रपत्र आयईपीएफ -५ मध्ये आयईपीएफकडे अर्ज करुन त्यासाठी दावा सादर करता येईल. सदर कार्यपध्दती कंपनीच्या www.nocil.com या संकेतस्थळावर आणि आयईपीएफच्या www.iepf.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील बाबतीत कोणत्याही चौकशीसाठी, भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे कंपनीचे निंबधक आणि शेअर हस्तांतरण एजंट यांना संपर्क साधावा:

श्री. वागोलू रत्न बाबु,
वरिष्ठ व्यवस्थापक,
मेसर्स केफिन टेकनॉलॉजिस लिमिटेड
युनिट : नोसिल लिमिटेड,
सेलेनियम टॉवर बी, भूखंड क्र. ३१-३२,
गाचीबावली, फायनान्शिअल डीस्ट्रीक्ट,
नानकरामगुडा, सेरीलिंगमपल्ली, हैद्राबाद, तेलंगणा - ५०००३२.
दु.क्र.:+ ९१ ०४०६७१६१६०६
ईमेल आयडी : einward.ris@kfintech.com;investorcare@nocil.com

**नोसिल लिमिटेडकरिता**
**स्वाक्षरी/-**
**अमित के. व्यास**
**साहाय्यक उपाध्यक्ष (विधि) व कंपनी सचिव**

**स्थळ: मुंबई**
**दिनांक: १२ मे, २०२२**



**हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड**
सीआयएन: L23201MH1952GOI008858
आज़ादी का अमृत महोत्सव

**नोंदणीकृत कार्यालय : पेट्रोलियम हाऊस, १७, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट मुंबई - ४०० ०२०**
**दुरध्वनी :** +९१-२२-२२८६३९०० **फॅक्स :** +९१-२२-२२८७२९९२
**संकेतस्थळ :** www.hindustanpetroleum.com **इमेल आयडी :** hpclinvestors@mail.hpcl.co.in

**सदस्यांना सूचना - टपालाद्वारे मतदान**

सदस्यांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा २०१३ **(कायदा)** च्या कलम १०८ आणि ११०, सहवाच्यता कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम २०१४ आणि सेबी (सूचिबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन २०१५ **(सेबी एओडीआर, २०१५)** ची पूर्तता करून कंपनीचे संचालक - वित्त म्हणून श्री रजनीश नारंग (डीआयएन: ०८१८८५४९) यांची नियुक्ती या सामान्य प्रस्तावास मान्यता देण्यासाठी टपालाद्वारे मतदान प्रक्रियाद्वारे कंपनीच्या सदस्यांची मान्यता प्राप्त करत आहे.

उक्तनिर्देशित नियामक तरतुदीं, या संदर्भात जारी करण्यात आलेली एमसीए परिपत्रके आणि सेबी एलओडीआर २०१५ च्या नियमन ४४ ची पूर्तता करत असताना फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमातून टपालाद्वारे मतदान सूचना पाठवण्यात आली आहे आणि मेसर्स सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) कडून दूरस्थ इ-मतदानाची सुविधा घेण्यात आली आहे. तसेच ही सूचना बुधवार ११ मे, २०२२ रोजी फक्त अशा सदस्यांना पाठविण्यात आली आहे ज्यांचे इमेल पत्ते कट-ऑफ दिनांक म्हणजे **शुक्रवार, दिनांक ०६ मे, २०२२** रोजी कंपनी/डिपॉझिटरींकडे नोंदणीकृत होते. अशी व्यक्ती जी कंपनीची कट-ऑफ दिनांकास सदस्य नाही त्यांनी टपाल मतपत्रिकेच्या या सूचनेला केवळ माहितीच्या उद्देशाने हाताळले पाहिजे.

टपालाद्वारे मतदानाच्या सूचना कंपनीच्या www.hindustanpetroleum.com या संकेतस्थळावरील गुंतवणूकदार विभागांतर्गत आणि सीडीएसएलच्या https://www.evotingindia.com या संकेतस्थळावर दुरस्थ ई-मतदानाची तपशीलवार प्रक्रिया नमूद करण्यात आली आहे आणि ती बीएसई लिमिटेड **(बीएसई)** आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड **(एनएसई)**ला अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com पाठवली जाईल.

दुरस्थ इ-मतदान प्रक्रियेच्या तारखांचा थोडक्यात सारांश देण्यात आला आहे:

| | |
|---|---|
| **दुरस्थ ई-मतदानाची सुरूवात** | गुरूवार, १२ मे, २०२२ रोजी सकाळी ९.०० वा. पासून (भाप्रवे) |
| **दुरस्थ ई-मतदानाची समाप्ती** | शुक्रवार, १० जुन, २०२२ रोजी संध्याकाळी ५.०० वा. पर्यंत (भाप्रवे) |
| **दुरस्थ ई-मतदानाची कट-ऑफ दिनांक** | शुक्रवार, ०६ मे, २०२२ |
| **दुरस्थ ई-मतदानाचा निकाल** | १३ जुन, २०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता किंवा त्यापूर्वी (भाप्रवे) |
| **दुरस्थ ई-मतदानाचा इव्हेंट क्रमांक** | इवीएसएन - २२०५०६००४ |

**टिपा:**

१) कृपया नोंद घ्यावी की सदर तारखेनंतर व वेळेनंतर सीडीएसएल द्वारे दुरस्थ ई-मतदानाचे मोड्युल ई-मतदानाकरिता अकार्यरत करण्यात येईल.

२) टपाली मतदान प्रक्रियेशी संबंधित सदस्यांना काही तक्रारी असल्यास, ते hpclinvestors@mail.hpcl.co.in वर ई-मेल पाठवू शकतात किंवा श्री के. एस. बालाजी, उप. कंपनी सचिव, हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, दुसरा मजला, शेअर्स विभाग, पेट्रोलियम हाऊस, १७, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२० यांना लिहू शकतात तसेच सदर सूचना www.hindustanpetroleum.com वरील गुंतवणूकदार विभागातून देखील डाऊनलोड केली जाऊ शकते.

३) इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करण्याच्या सुविधेशी संबंधित सर्व तक्रारी श्री राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, (सीडीएसएल) सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाउंड्स, एन एम जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई - ४०००१३ यांच्याकडे पाठवल्या जाऊ शकतात किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल पाठवा किंवा टोलफ्री क्रमांक १८०० २२ ५५ ३३ यावर कॉल करा.

४) ज्या सदस्यांनी भौतिक स्वरूपात शेअर धारण केले आहेत आणि ज्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे अपडेट केलेले नाहीत त्यांनी आवश्यक कागदपत्रे प्रदान करून संबंधित ई-मेल पत्ता अद्यतनित करण्यासाठी कंपनी किंवा रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट (मे. लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, युनिट: हिन्दुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड, सी १०१, २४७ पार्क, लाल बहादुर शास्त्री मार्ग, विक्रोळी पश्चिम, मुंबई - ४०००८३, ईमेल आयडी : rnt.helpdesk@linkintime.com) यांना लिहिण्याची विनंती केली जाते. इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी सहभागींकडे त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणी/अद्यावत करण्याची विनंती केली जाते.

५) कट-ऑफ दिनांक म्हणजेच शुक्रवार, ०६ मे, २०२२ नुसार शेअर्स धारण केलेले सदस्य, एचपीसीएलच्या वेबलिंक https://www.hindustanpetroleum.com/postal-ballot वर टपाली मतदानाची सूचना मिळवू शकतात आणि दुरस्थ ई-मतदानासाठी युजर आयडी आणि पासवर्ड मिळवण्यासाठी टपाली मतदानाच्या सूचनेमध्ये दिलेल्या सूचनांचा संदर्भ घेऊ शकतात.

६) टपाली मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पडण्यासाठी कंपनीने श्री उपेंद्र शुक्ला, व्यवसायिक कंपनी सचिव यांची छाननीकर्ता म्हणून नेमणूक केलेली आहे.

टपाली मतदानाचा निकाल निर्दिष्ट वेळेत कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात घोषित करण्यात येईल व तो बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांना अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com वर आणि सीडीएसएलच्या https://www.evotingindia.com या संकेतस्थळावर सूचित केले जाईल तसेच तो आमचे संकेतस्थळ www.hindustanpetroleum.com च्या इन्वेस्टर्स विभागावरही प्रदर्शित करण्यात येईल.

**तारीख : ११ मे, २०२२**
**स्थान : मुंबई**

**मंडळाच्या आदेशाद्वारे**
**वी. मुरली**
**कंपनी सचिव**

/hpcl | /hpcl | /hpcl
www.hindustanpetroleum.com
Wear reusable face cover or mask
Wash hands frequently and thoroughly
2 Gaj ki Doori (6 feet)
Maintain Physical Distance



**ट्रेंट लिमिटेड**

**कॉर्पोरेट ओळख क्र.: L24240MH1952PLC008951;**
**नोंदणीकृत कार्यालयः** बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई - ४०० ००१;
**कॉर्पोरेट कार्यालयः** ट्रेंट हाऊस, जी ब्लॉक, प्लॉट नं. सी-६०, सिटी बँकेच्या बाजूला, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा पूर्व, मुंबई - ४०० ०५१; **दूर.:** (९१-२२) ६७०० ८०९०;
**ई-मेलः** investor.relations@trent-tata.com; **वेबसाइटः** www.trentlimited.com

**सूचना**

ट्रेंट लिमिटेड (कंपनी) ची ७०वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारा जारी केलेल्या १४ डिसेंबर २०२१ सह इतर संबंधित परिपत्रकांसह ५ मे २०२० च्या सामान्य परिपत्रकांसह (एमसीए परिपत्रक) सहीत कंपनी कायदा, २०१३ (अधिनियम) च्या लागू तरतुदी आणि त्या अनुषंगाने बनवलेल्या नियमांचे पालन करून व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे बोलावली जाईल.

कंपनीच्या सदस्यांची ७०वी एजीएम शुक्रवार, १० जून, २०२२ रोजी दुपारी २:३० (भाप्रवे) वाजता एजीएम बोलावण्याच्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवसायाचा व्यवहार करण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरीज लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे प्रदान केलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे आयोजित केली जाईल. एजीएमच्या सूचनेसह आर्थिक वर्ष २०२१-२२ करिता कंपनीच्या ७०व्या वार्षिक अहवालाची ई-प्रत कंपनीच्या वेबसाइट www.trentlimited.com वर एनएसडीएलच्या वेबसाइट www.evoting.nsdl.com तसेच स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट www.nseindia.com आणि www.bseindia.com वर उपलब्ध करून दिली जाईल. सदस्य केवळ व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात, ज्याचा तपशील कंपनी एजीएमच्या सूचनेमध्ये प्रदान करेल. तद्नुसार, कृपया नोंद घ्यावी की, कंपनीच्या ७०व्या एजीएममध्ये वैयक्तिकरित्या उपस्थित राहण्याची आणि सहभागी होण्याची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहणारे सदस्यांची उपस्थिती कायद्याच्या कलम १०३ अंतर्गत किमान गणसंख्या मोजण्याच्या उद्देशाने मोजली जाईल.

वार्षिक अहवाल २०२१-२२ सोबत एजीएमची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्या सदस्यांना पाठवली जाईल ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरीजमध्ये नोंदणीकृत आहेत, जोपर्यंत कोणत्याही सदस्याने कंपनीला investor.relations@trent-tata.com वर पत्र लिहून त्याची भौतिक प्रत देण्याची विनंती केली नाही. इतर सदस्य ज्यांनी त्यांच्या ई-मेल पत्त्यांसह नोंदणी केलेली नाही, त्यांच्या भौतिक प्रती परवानगी दिलेल्या मोडमध्ये पाठवल्या जातील. ज्या सभासदांनी अद्याप त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांनी शुक्रवार, ३ जून, २०२२ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपूर्वी (भाप्रवे) एजीएमची सूचना प्राप्त करण्यासाठी त्यांच्या ई-मेल पत्त्यांची नोंदणी करण्यासाठी आणि वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आणि ई-मतदानासाठी लॉगिन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्यासाठी खाली नमूद केलेल्या प्रक्रियेचे अनुसरण करावे.

**ई-मेल पत्त्याची नोंदणी करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रक्रियेचे अनुसरण करावयाचे आहेः**

अ) https://tcpl.linkintime.co.in/EmailReg/Email_Register.html या लिंकवर भेट द्या.
ब) ड्रॉपडाउन मधून कंपनीचे नाव निवडा उदा ट्रेंट लिमिटेड.
क) डीपी आयडी आणि क्लायंट आयडी / फिजिकल फोलिओ क्रमांक, सदस्याचे नाव आणि पॅन तपशील प्रविष्ट करा. भौतिक स्वरुपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांनी शेअर सर्टिफिकेट क्रमांकांपैकी एक एंटर करणे आवश्यक आहे.
ड) मोबाईल नंबर आणि ईमेल आयडी टाका आणि सुरू ठेवा बटणावर क्लिक करा.
ई) सिस्टम मोबाईल नंबर आणि ई-मेल आयडीवर ओटीपी पाठवेल.
फ) अपलोड करा.
१. पॅन कार्डची स्व-साक्षांकित प्रत आणि
२. पत्त्याचा पुरावा उदा. आधार कार्ड, पासपोर्ट किंवा फिजिकल फोलिओच्या बाबतीत शेअर सर्टिफिकेटची पुढची आणि मागील बाजू.
ग) मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीवर प्राप्त झालेला ओटीपी प्रविष्ट करा.
ह) त्यानंतर ही एजीएम सूचना प्राप्त करण्यासाठी सिस्टम ई-मेल पत्त्याची पुष्टी करेल.

ई-मेल पत्ता यशस्वीरित्या सबमिट केल्यानंतर, एनएसडीएल एजीएम सूचना आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या वार्षिक अहवालाची प्रत ई-मतदान वापरकर्ता आयडी आणि पासवर्डसह ई-मेल करेल. काही शंका असल्यास, सदस्य csg-unit@tcplindia.co.in किंवा evoting@nsdl.co.in वर लिहू शकतात.

कंपनीला त्यांच्या सर्व सदस्यांना एजीएमच्या सूचनेमध्ये विहित केलेल्या सर्व प्रस्तावांवर आपले मत देण्यासाठी एनएसडीएलची रिमोट ई-मतदान सुविधा (रिमोट ई-व्होटिंग) उपलब्ध करून देताना आनंद होत आहे. याव्यतिरिक्त, कंपनी एजीएम दरम्यान रिमोट ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्याची सुविधा देखील प्रदान करेल. एजीएम / एजीएम दरम्यान रिमोट ई-व्होटिंगपूर्वी रिमोट ई-व्होटिंगची तपशीलवार प्रक्रिया नोटिसमध्ये उपलब्ध करून दिली जाईल.

इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सेवेद्वारे किंवा इतर कोणत्याही माध्यमांद्वारे थेट त्यांच्या बँक खात्यांमध्ये लाभांश प्राप्त करण्याचा आदेश अद्ययावत केलेला नसलेल्या भौतिक स्वरूपात शेअर्स धारण केलेल्या सदस्यांना खालील तपशील/कागदपत्रांची स्कॅन केलेली प्रत csg-unit@tcplindia.co.in वर सोमवार, २३ मे, २०२२ पर्यंत पाठवण्याची विनंती केली जाते, जी रेकॉर्डची तारीख आहेः

अ) तुमचे नाव, फोलिओ क्रमांक, पूर्ण पत्ता आणि लाभांश ज्या बँक खात्यात मिळणार आहे त्या खात्याशी संबंधित खालील तपशील असलेले स्वाक्षरी केलेले विनंती पत्र.
i) बँकेचे नाव आणि शाखा आणि बँक खाते प्रकार;
ii) कोअर बँकिंग सोल्यूशनच्या अंमलबजावणीनंतर तुमच्या बँकेने दिलेला बँक खाते क्रमांक आणि प्रकार;
iii) ११ अंकी आयएफएससी कोड
ब) शेअर्स संयुक्तपणे असल्यास सदस्याच्या किंवा पहिल्या धारकाच्या नावाने रद्द केलेल्या चेकची स्व-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत.
क) पॅन कार्डाची स्व-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत; आणि
ड) कंपनीकडे नोंदणीकृत सदस्याच्या पत्त्याच्या समर्थनार्थ कोणत्याही दस्तऐवजाची (जसे की आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट) स्व-प्रमाणित स्कॅन केलेली प्रत.

डीमॅट फॉर्ममध्ये शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी सहभागींसोबत इलेक्ट्रॉनिक बँक आदेश अपडेट करण्याची विनंती केली जाते.

सभासदांनी एजीएममध्ये घोषित केलेल्या लाभांशाच्या अधीन राहून आणि वित्त कायदा, २०२० नुसार, लाभांश उत्पन्न १ एप्रिल २०२० पासून सदस्यांच्या हातात करपात्र असेल आणि कंपनीने आयकर कायदा, 1961 (आयटी कायदा) मध्ये विहित केलेल्या दरांवर सभासदांना दिलेल्या लाभांशातून, लागू असल्याप्रमाणे स्रोतावरील कर (टीडीएस) कापून घेणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे, टीडीएस आवश्यकतांचे पालन करण्यास सक्षम करण्यासाठी, सदस्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांची निवासी स्थिती, पॅन, श्रेणी त्यांच्या डीपीसह आयडी कायद्यानुसार पूर्ण करा आणि/किंवा अद्ययावत करा किंवा शेअर्स कंपनी/निबंधक यांच्याकडे भौतिक स्वरूपात असतील तर शुक्रवार, २० मे २०२२ पर्यंत ई-मेलद्वारे कागदपत्रे पाठवावीत. त्याची तपशीलवार प्रक्रिया कंपनीच्या वेबसाइट www.trentlimited.com वर उपलब्ध आहे.

**ठिकाणः मुंबई**
**दिनांकः ११ मे, २०२२**

**ट्रेंट लिमिटेड करिता**
**एम. एम. सुरती**
**कंपनी सचिव**


CMYK